जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:- १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०
३. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य, दिनांक १४/०३/२०२०
४. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्रमांक ४०-३/२०२०-DM- १(A) दिनांक २४/०३/२०२०
५. या कार्यालयाचे आदेश क्र. २०२०/उपचिटणीस/एमएजी/सीआर-२६ दि. २४/०३/२०२०
६. महाराष्ट्र शासन, वन व महसूल विभाग,आपत्ती व्यवस्थापन विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, यांची अधिसूचना दिनांक २५/०३/२०२०
७. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, यांचे पत्र व मार्गदर्शक सूचना दिनांक २६/०३/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि.२९/०३/२०२०

**विषय:-** District Incident Commander नियुक्त करणे बाबत व कार्यकारी दंडाधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.

**आदेश:-**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणु संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुंचे संसर्गात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपायोजना आखणे आवश्यक आहे. या पार्श्वभुमीवर मी दिपा मुधोळ-मुंडे अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन व समन्वय, क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविण्याचे व क्षेत्रीय स्तरावर आदेश देणे, वाहतुकीबाबत अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबंधीतांना आदेश देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद, श्री. राजेंद्र खंदारे यांची **District Incident Commander** म्हणून नियुक्ती करीत आहे.

२. उस्मानाबाद जिल्हयातील सर्व नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रातील मुख्याधिकारी, हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील व मुख्याधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त प्रत्येक वार्डात

Scanned by CamScanner

पथक स्थापन करुन त्याची माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी तसेच कोरोना (कोव्हिड १९) विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मुख्याधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकारी यांना नगर परिषद/ नगर पंचायत क्षेत्रात कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकार प्रदान करण्यासाठी अधिका-यांची नावे व पदनामासह मुख्याधिकारी यांनी तात्काळ प्रस्ताव सादर करावा.

३. सर्व तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक महसुल मंडळ निहाय महसूल मंडळ अधिकारी यांचे नेवृत्वात एक पथक तयार करुन व दोन महसुल मंडळ निहाय एक नायब तहसिलदार यांची कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करुन त्याचा संपुर्ण अहवाल तात्काळ सादर करावा.

४. उक्त नियुक्त सर्व पथक **District Incident Commander** निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे नियंत्रणात काम करतील तसेच कायदा व सुव्यवस्थेबाबत नियंत्रण व समन्वय, क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविणे, क्षेत्रीय स्तरावर जिल्हा प्रशासनाचे आदेश पोहचविणे व आदेश देणे, वाहतुकीमधील अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबंधीतांना आदेश देणे यासाठी काम करतील.

29/3/20

**(दिप्रा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद.
३. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
४. जिल्हा प्रशासन अधिकारी, उस्मानाबाद
५. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
७. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
८. सर्व उपविभागीय दंडाधिकारी तथा **Incident Commander** जिल्हा उस्मानाबाद
९. सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद
१०.सर्व तालुका दंडाधिकारी तथा **Incident Commander** जिल्हा उस्मानाबाद
११.सर्व मुख्याधिकारी,नगर परिषद / नगर पंचायत, जिल्हा उस्मानाबाद

29/3/20

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**

Scanned by CamScanner